# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com
Website: www.jdroamt.org

Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/एफसी/२०१६/ ३८०३
दिनांक :- 20 DEC 2016

प्रति

**प्राचार्य,**
सर्व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या पडताळणी करण्याबाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-
२अ/एडीएम/गुणवत्ता यादी/२०१६/१३४४ दि. ६ ऑक्टोंबर २०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास सादर करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायीक अभ्यासक्रम चालविणा-या पदव्युत्तर पदवी संस्थांची या कार्यालयाव्दारे गुणवत्ता यादीची तपासणी करण्यात आलेली आहे. तपासणी केलेल्या गुणवत्ता याद्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, ब-याचश्या पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए./एम.सी.ए./एम.ई./एम.फार्म ) संस्थांच्या गुणवत्ता यादीमध्ये जे विद्यार्थी अंतिम वर्षाकरीता प्रवेशित होते व ज्यांचे निकाल कॅप फेरी पर्यंत **(दिनांक १०/८/२०१६)** लागलेले नसल्याने त्यांचे निकाल (Graduation Percentage) या रकान्यामध्ये भरलेले दिसुन येते नाही. तसेच संचालनालयाचे संदर्भीय पत्रातील (अ.क्र. १९ नुसार) अश्या विद्यार्थ्यांचे गुण (Graduation Percentage) या रकान्यात भरल्याशिवाय अश्या उमेदवाराच्या प्रवेशाची प्रवेश नियंत्रण समितीस शिफारस करण्यात येऊ नये असे कळविलेले आहे.

तेव्हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या राबविणा-या अश्या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, अश्या विद्यार्थ्यांचे निकालाची गुणपत्रिका या कार्यालयास सादर करुन व स्वतः या कार्यालयात हजर राहुन या कार्यालयातील प्रोग्रामर, यांच्याकडुन अंतिम वषाचे गुण ऑनलॉईन अपलोड **दिनांक २३/१२/२०१६** पर्यंत करुन घ्यावेत. त्याशिवाय सदर गुणवत्ता याद्या प्रवेश नियंत्रण समितीस सादर करु नये. दिलेल्या मुदतीनंतर अश्या प्रकरणी कार्यवाही केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी तसेच भविष्यात काही अडचण निर्माण झाल्यास संस्था जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

D:\all Manish letter 30 O-.doc